**प्रेस नोट**

**दिनांक - २१/०४/२०२६**

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०४, मुंबई

**अ‍ॅन्टॉपहिल पोलीस ठाणे, मुंबई**

**<u>अपहरणासह जबरी चोरी करणा-या ०६ आरोपीस मुंबई व गोवा या ठिकाणाहून अवघ्या ०६ तासात अटक करुन गंभीर गुन्हा उघडकीस आणलेबाबत.</u>**

फिर्यादी नामे श्री. श्रवण लक्ष्मण रावल, वय ४५ वर्षे, विरार पश्चिम जिल्हा पालघर हे अ‍ॅन्टॉप हिल, येथून पायी जात असताना ४ अनोळखी इसमांनी त्यांना चारचाकी वाहनामध्ये जबरदस्तीने घेवुन जावुन त्यास धमकी देवून त्याच्या ताब्यातील ३२,५०,०००/- रू. रोख रक्कम काढून घेवुन त्याला घाटकोपर परीसरात सोडुन दिले म्हणून फिर्यादीने दिलेल्या तक्रारीप्रमाणे अ‍ॅन्टॉप हिल पोलीस ठाणे, गु.र.क्र. २२६/२६ कलम १३७(२),३०९(२),३(५) भा.न्या.संहिता अन्वये दरोडयाचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

नमुद गुन्हा अतिशय क्लिष्ट असल्याने व गुन्हा उघडकीस आणण्याच्या अनुषंगाने कोणतेही धागेदोरे प्राप्त होत नसल्याने सदर कंपनीमधुन मागील १ वर्षामध्ये नोकरी सोडुन गेलेल्या ८ लोकांची माहिती चे तांत्रिक विश्लेषण करून एका संशयीत इसमाची माहिती प्राप्त केली. सदर इसमास गुप्त बातमीदाराच्या मदतीने चेंबुर परीसरातुन ताब्यात घेतले व त्याच्याकडे गुन्हयाचे अनुषंगाने विचारपुस केली असता त्याने व त्याच्या इतर ०७ साथीरांनी मिळुन नमुद गुन्हा केला असल्याची कबुली दिली.

नमुद गुन्हयात आतापर्यंत एकुण ६ आरोपीतांन अटक करण्यात आलेले असून ते नामे १) राहूल एकनाथ गायकवाड, वय ३० वर्षे, २) इरफान अली अहमद अली खान वय ३३ वर्षे, ३)विवेक विलास काकडे वय ३२ वर्षे, ४) संतोष वसंत मलेकर वय ४४ वर्षे, ५) स्वप्नील चंद्रकांत पाटील वय ३४ वर्षे, व ६) मोहम्मद रिजवान अन्सार, वय ४१ वर्षे, असे त्यापैकी ०२ आरोपीत हा नालासोपारा, ०३ आरोपीत हे गोवा राज्य, ०१ नेहरुनगर कुर्ला मुंबई याठिकाणा वरुन अटक केली असुन एकुण रोख त्याच्याकडून एकून २९,६९,०००/- रू. चा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची उत्कृष्ट कामगिरी मा.पोलीस आयुक्त, श्री.देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त श्री. सत्यनारायण चौधरी (कायदा व सुव्यवस्था), अप्पर पोलीस आयुक्त श्री. विक्रम देशमाने (मध्य प्रादेशिक विभाग ), पोलीस उप आयुक्त श्रीमती रागसुधा आर,(परिमंडळ ४), सहा.पोलीस आयुक्त श्री.सुहास कांबळे (सायन विभाग), यांच्या मार्गदर्शनाखाली व.पो.नि. शिवाजी पावडे, पो.नि.गोपाळ भोसले (गुन्हे) पो. नि. समीर कांबळे, स.पो.नि. सतीश कांबळे, स.पो.नि. शिवाजी मदने, स.पो.नि. प्रदिप पाटील, पो. उप.नि. संदीप सोनवलकर, पो.ह.०७०४९१/गस्ते, पो.ह.क्र.०७०९०६/टेळे, पो.ह.क्र.०७०६७४/ठोके, पो.शि.क्र.०८१०४२/ठाकुर पो.शि.क्र.०९२५१६/पाटील, पो.शि.क्र.११०७९५/आमदे, पो.शि.क्र. ११३४१४/बाबर, पो.शि.क्र.१११९२८/माने, पो.शि.क्र. १४०१८८/ विसपुते, पो.शि.क्र. १५०२३१/माने, पो.शि.क्र.१५०४५८/किरतकर, पो.शि.क्र.१५१४४६/सजगणे, यांनी पार पाडली आहे.

***

Scanned with CamScanner